# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/२६९ /२०२४-२५** **दिनांक : ०९ /०७ /२०२४**

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय – संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कांचन गायकवाड)
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/२८१ /२०२४-२५ दिनांक :०१ /०७ /२०२४

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र | वृक्षाचे नाव/ठिकाण | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) दिव्या सतीश पुरोहित यांचे दि.२१/६/२०२४ रोजीचे पत्र** | | | | | |
| १ | पेल्ट्रोफॉर्म | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड महाराशी परशार चारीटेबल ट्रस्ट,म्हाडा कॉलनी रोड,मिरारोड (पु.) येथील असून झाडाच्या मुळया वरती येवून स्टाईलचे नुकसान झालेले आहे. तसेच झाड पूर्णपणे एका बाजूस मनपा रोड कडे झुकलेले आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. |
| **२) शांतीनाथ दर्शन को.ऑ.हो.सो.लि यांचे दि.२१/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | नारल | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड शांतीनाथ दर्शन को.ऑ.हो.सो.लि.,शांती पार्क, मिरारोड (पु.) येथिल असून झुकलेल्या अवस्थेत आहे. झाडाची मुळे वरती आली आहे. तसेच झाडा वरचे नारळ वारंवार पार्कीग मध्ये पडत आहे,वाहनांचे नुकसान होत आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| **३)रोझ अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२८/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | कदंबा | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड रोझ अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो.लि. गोयल प्लाझा बिल्डीग समोर ,शिवार गार्डन जवळ मिरारोड (पु.) येथिल मनपा रोडवरील असून झाडाची मुळे जमिनीवर आलेली आहे तसेच टाईल्स उखडलेल्या आहे आणि झाड एका बाजूने झुकलेले आहे. झाडाची मुळे वर आल्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| **४)राज लाईफ स्टाईल को.ऑ.हौ.सो.लि यांचे दि.१४/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | आरेकापाम | २० ते २५ फुट | ०२ | ०८ वर्ष | सदरची झाडे राज लाईफ स्टाईल को.ऑ.हौ.सो.लि, हटकेश,जीसीसी क्लब सो.समोर,मिरारोड (पु.) येथिल असून सोसायटीच्या बाहेरील बाजूला स्टेअरच्या बाजुला कट्टडे मध्ये लावलेली झाडे मोठी होऊन त्याची मुळे वर आलेली दिसत आहे. झाडाची मुळे बाहेर येऊन पुर्णपणे झाडा भोवती कट्टाडा तुटला आहे. झाडाचा वरचा भाग वजनदार झालेला आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाडे पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे. |
| २ | कपाशी | २० ते २५ फुट | ०२ | ०८ वर्ष | |

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **५)राम —टेक को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.१८/०६/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | नारळ | २० ते २५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड राम —टेक को.ऑ.हौ.सो.लि.,डी-०९/डी -१० रामदेव पार्क,सिनेमॅक्स जवळ,मिरा भाईदर रोड,मिरारोड (पु.) येथिल असून नारळाची मुळे जमिनीवर आलेली आहे.झाडाभोवती असलेला कट्टडा तुटलेला आहे. तसेच झाडाची मुळे ही बाजूच्या सोसायटीच्या भिंतीवर वाढलेली असून भिंतीला तडा गेला आहे. व झाडाचे खोड किड लागुन कुजलेले दिसत आहे त्यामुळे झाड जोराच्या वाऱ्याने-पावसाने पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका